जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : ४०व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय चाचणी (एम. सेट) परीक्षेचे आयोजन रविवार,दि. १५जून रोजी विविध सात केंद्रांवर करण्यात येणार आहे.

ही परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या मार्फत जळगाव केंद्रावर आयोजित केली जाणार आहे. या परीक्षेरीता जळगाव शहरातील खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय परिसरातील परीक्षा केंद्र स्वामी विवेकानंद भवन -अ (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०१), स्वामी विवेकानंद भवन -ब (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०२) , स्वामी विवेकानंद भवन -क (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०३) , शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केंद्र सांकेतांक -१४०४), के.सी.ई. ए.टी. झांबरे माध्य. महाविद्यालय (केंद्र सांकेतांक क्रमांक १४०५), खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर (आयएमआर) (केंद्र सांकेतांक -१४०६), खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय (केंद्र सांकेतांक -१४०७) या सात केंद्रावर सेट परीक्षा घेण्यात येणार असून या परीक्षेकरीता २९३६ विद्यार्थी विविध विषयांकरीता प्रविष्ट होणार आहे. असे ४० वी सेट परीक्षा संपर्क व्यक्ती तथा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी कळविले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : सराव, संतुलित आहार, तंदुरुस्त राहणे या गोष्टी अंगिकारल्या तर खेळामध्ये प्राविण्य मिळवून यश संपादन करता येते असे प्रतिपादन प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी विद्यापीठात आयोजित मैदानी खेळांच्या सराव शिबीराच्या समारोप प्रसंगी केले.

यावेळी मंचावर अधिसभा सदस्य स्वप्नाली काळे-महाजन, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, व कक्षअधिकारी प्रवीण चंदनकर उपस्थित होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दि. ३ जुनपासून मैदानी खेळांच्या सराव शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा.इंगळे पुढे म्हणाले की, खेळाडू विद्यार्थ्यांनी या शिबीरात त्यांना ज्या खेळाची आवड आहे त्याची मिळालेली पुर्ण माहिती , सरावाचे मार्गदर्शन आणि स्पर्धा जिंकण्यासाठी तज्ञांनी सुचविलेले तंत्र यांचा नियमित सराव करुन उत्तम खेळाडू होण्याची जिज्ञासा बाळगावी.

या सराव शिबीरात सहभागी खेळाडू शहादा येथील विकास महाविद्यालयातील मनोहर सुर्यवंशी याने सांगितले की सरावामुळे व मार्गदर्शनामुळे क्षमता वाढली आत्मविश्वास निर्माण झाला. तळोदा येथील महाविद्यालयातील बालदी वसावे हिने सांगितले की, आमच्या गावी रोड रस्ता नाही. परंतु . या सराव शिबीरात संधी मिळाल्यामुळे सराव कसा करावा, आहार कसा घ्यावा, तंदुरुस्त कसे रहावे आदी गोष्टी शिकायला मिळाल्या त्यामुळे भविष्यात खेळाडू होण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. दोंडाईचा येथील रावल महाविद्यालयाचा विद्यार्थी अल्पेश भोई याने खेळांबद्दल तंत्रशुध्द माहिती मिळाली. तंत्र शिकलो . स्वत:मध्ये प्रगती करण्याची संधी मिळाली. चाळीसगाव येथील खुशी घुले हीने अतिशय चांगल्या पध्दतीने तज्ञांनी मार्गदर्शन केले, सराव करुन घेतला. आरोग्याच्या सुविधा मिळाल्या. त्यामुळे ह्या सराव शिबीराचा मोठा फायदा होणार असल्याचे व्यक्त केले. प्रास्ताविक व आभार क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. शैलेश पाटील यांनी केले. या सराव शिबीरात ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

त्याना या शिबीरात १०० मीटर, २०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, ५ हजार मीटर, १० हजार मीटर धावणे तसेच लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, अर्ध मॅरॉथॉन, रिले अशा विविध क्रीडा प्रकारांच्या सराव खेळाडुंकडुन करुन घेण्यात आला.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३३ वा दीक्षांत समारंभातील पोस्टाने परत आलेले ३६१ पदवी प्रमाणपत्र तसेच शैक्षणिक पात्रता पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांचे ७८० पदवी प्रमाणपत्र विद्यापीठातून घेऊन जाणे करीता आवाहन करण्यात आले आहे.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

विद्यापीठाच्या ३३ वा दीक्षांत समारंभ ८ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाला. या समारंभातील काही विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात आले होते. परंतु विविध कारणास्तव हे ३६१ प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना पोस्टाने मिळाली नाहीत त्यांची यादी व शैक्षणिक पात्रता पूर्ण न केलेल्या ७८० प्रमाणपत्रांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर nmu.ac.in – Student Corner – Convocation प्रसिध्द केली आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र विद्यापीठामध्ये पोस्टाने परत आले आहे मात्र त्यांना विद्यापीठात येणे शक्य नाही त्यांनी रु. १०० चा धनाकर्ष /ऑनलाईन रक्कम भरुन सुधारित पत्ता कळविल्यास त्यांना पुन्हा प्रमाणपत्र पाठविण्यात येईल. अशी माहीती परीक्षा व मुल्यमापन केंद्राचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी दिली.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १२ जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता